# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०८ जुलै, २०२५ / आषाढ १७, १९४७ (शके)**

**(१) महसूल मंत्री**
**(२) वने मंत्री**
**(३) आदिवासी विकास मंत्री**
**(४) कृषी मंत्री**
**(५) सामाजिक न्याय मंत्री**
**(६) रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री**
**(७) मदत व पुनर्वसन मंत्री**
**(८) मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री**

} **यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २४**

---

## जालना जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) * २४४१ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) टप्पा-१ अंतर्गत मोठ्या प्रमाणावर अनियमितता व कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी गठीत करण्यात आलेल्या दक्षता पथकाने प्राथमिक चौकशीत तत्कालीन उपविभागीय कृषी अधिकारी, जालना व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमताने शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी त्यांच्या विरोधात निधीच्या वसुलीचे आदेश जारी केल्याची बाब माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित प्रकरणी दोषी असलेल्या उपविभागीय कृषी अधिकारी यांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले असूनही त्यांना पुढे कृषी अधीक्षक पदावर पदोन्नती देऊन अन्यत्र बदली करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरव्यवहार प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विभागीय कृषी सहसंचालक यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले होते आणि १८ चौकशी पथकांमार्फत १५ दिवसात चौकशी पूर्ण करण्याचे निर्देश कृषी आयुक्तांनी दिले होते, तथापि, सदरहू पथकाने अद्यापही चौकशी पूर्ण केली नसल्याने चौकशी अधिकारी यांनी इतर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त योजनेंतर्गत अनियमितता व कोट्यवधी रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी शासनाच्या आदेशानंतरही चौकशीत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) सन २०२०-२१ ते २०२३-२४ या कालावधीमध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेंतर्गत जालना उप विभागातील तालुक्यांमध्ये शेडनेट हाऊस या घटकांची अंमलबजावणी करताना मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होऊन झालेल्या अनियमिततेबाबत संबंधितांविरूध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव कृषी आयुक्तालय, पुणे यांनी दिनांक ३०/०८/२०२४ रोजी शासनास सादर केला. प्रकरणातील संबंधित अपचारी अधिकाऱ्यांविरूध्द दिनांक २३/०९/२०२४ च्या शासन ज्ञापन व आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८ खाली दोषारोपपत्र बजावून विभागीय चौकशी सूरू करण्यात आली आहे.
(२) संबंधित उप विभागीय कृषी अधिकारी यांना दिनांक १२/०३/२०२४ च्या शासन आदेशान्वये "अधीक्षक कृषी अधिकारी" या पदावर पदोन्नती देण्यात आली होती. सदर प्रकरणी कृषी आयुक्तालयाच्या प्रस्तावानुसार संबंधित उप विभागीय कृषी अधिकारी यांना दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी जालना जिल्ह्यात दक्षता पथक/ विशेष पथकामार्फत धडक मोहिम राबवून लेखापरिक्षणासह १०० टक्के तपासणी करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३०/१०/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे.

यानुषंगाने सखोल तपासणी करण्यासाठी दक्षता पथक कृषी आयुक्तालय मार्फत छत्रपती संभाजीनगर व लातूर विभागातील गट-अ संवर्गातील अधिकारी यांची पथके स्थापन करण्यात आली असून जालना जिल्ह्यातील ३२५८ शेडनेटपैकी १०७९ शेडनेटची तपासणी पूर्ण झाली आहे. उर्वरीत शेडनेटची तपासणी विभागीय कृषी सह संचालक, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयामार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबट्यांच्या संख्येत वाढ झाल्याबाबत

**(२) * ३१०४ श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली व लगतच्या परिसरात बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली असून सन २०१४-१५ मध्ये या ठिकाणी असलेली सुमारे २३ इतकी संख्या वाढून ५४ पर्यंत पोहोचली असून मागील १० वर्षांत बोरीवली, गोरेगाव, पवई, भांडुप आणि मुलुंड यासारख्या मानवी वस्त्यांमध्ये बिबट्याने सातत्याने शिरकाव केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बिबट्यांची वाढती संख्या आणि त्यांच्या अधिवासाच्या सीमिततेमुळे भविष्यात मनुष्य-प्राणी संघर्ष अधिक वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व लगतच्या परिसरातील मनुष्य-प्राणी संघर्ष टाळण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) वार्षिक वन्यप्राणी गणणेनुसार संजय गांधी राष्ट्रीय उद्यान क्षेत्रात सन २०१५ मध्ये ३५, सन २०१७ मध्ये ४१, सन २०१८ मध्ये ४७, सन २०१९ मध्ये ४६, सन २०२३ मध्ये ५२ व सन २०२४ मध्ये ५४ बिबटे असल्याचे निदर्शनास आले आहे.

बोरीवली, गोरेगाव, पवई, भांडुप आणि मुलुंड यासारख्या मानवी वस्त्यांमध्ये अंदाजे मागील १० वर्षात मानवी वस्त्यांमध्ये बिबट या वन्यप्राण्याने शिरकाव केल्याच्या ३२ घटना निदर्शनास आल्या आहेत.
(२) संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रशासनामार्फत वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे प्रभावीपणे संवर्धन करण्यात आल्यामुळे बिबट्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे.

बिबट्यांच्या वाढत्या संख्येमुळे सदर वन्यप्राणी त्यांचे नैसर्गिक अधिवासाच्या शोधात स्थलांतर करीत असतात सदर प्रक्रिये दरम्यान मानव-वन्यप्राणी संघर्षाच्या घटना झाल्याचे निदर्शनास आल्या आहेत.
(३) व (४) मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.
- मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.
- स्थानिक पातळीवरील वन कर्मचारी व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते. तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.
- आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.
- नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्राण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

-----------------

## फडतरवाडी (नेर) (ता.खटाव, जि.सातारा) येथे बेकायदेशीररित्या स्टोन क्रशर सुरु असल्याबाबत

**(३)** * **२२९९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिहे-कठापूर (जि.सातारा) उपसा सिंचन योजनेचे उपठेकेदार पी.एम.बी. इन्फ्रास्ट्रक्चर एल.एल.पी. या कंपनीने फडतरवाडी (नेर) (ता.खटाव) येथील गावठाणालगत मागील दीड वर्षांपासून बेकायदेशीरपणे सुरू केलेल्या स्टोन क्रशरच्या ध्वनी व धुळीमुळे स्थानिक नागरिकांना विशेषतः लहान मुलांना आरोग्याच्या

गंभीर समस्या निर्माण होत असून धुळीमुळे शेकडो हेक्टर शेतीचे नुकसान होत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बेकायदेशीर स्टोन क्रशरमुळे नागरिकांचे आरोग्य आणि शेती दोन्ही धोक्यात आल्याने स्टोन क्रशर तात्काळ बंद करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच बेकायदेशीरपणे स्टोन क्रशर सुरु करणाऱ्या कंपनी विरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अशी बाब नाही.

(२) कै.लक्ष्मणरावजी इनामदार उपसा सिंचन योजना (जिहे कठापूर) या प्रकल्पांतर्गत आंधळी बोगद्याचे संधानकीय अस्तरीकरणाचे कामासाठी क्रश सँड व खडी तयार करण्याकरीता मौजे फडतरवाडी (नेर) येथील ग.नं. ५४ मध्ये स्टोन क्रशर बसविणेस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून रितसर परवानगी प्राप्त केली आहे.

सदर स्टोन क्रशर दिनांक १०/०३/२०२५ रोजी सुरू झाला होता. तथापि, दिनांक २६/०३/२०२५ रोजी सदर क्रशर बंद करण्यात आला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी यांच्या अहवालानुसार मौजे फडतरवाडी (नेर), ता.खटाव येथील स्टोन क्रशरच्या ध्वनी व धुळीमुळे स्थानिक नागरिकांना विशेषत: लहान मुलांना आरोग्याच्या गंभीर समस्या उद्‌भवत असलेबाबत कोणतेही तक्रार प्राप्त नाही. तसेच कृषी अधिकारी यांच्या अहवालानुसार त्यांना स्टोन क्रशर मुळे शेती धोक्यात आली असल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापुर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची पीक विम्याची रक्कम प्रलंबित असल्याबाबत

**(४) * ३३७३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर जिल्ह्यातील सुमारे २ लाख ३९ हजार शेतकऱ्यांना खरीप हंगामाकरीता सन २०२४ या वर्षासाठी एकूण २७९ कोटी रुपयांची पीक विमा रक्कम विमा कंपनीमार्फत मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नैसर्गिक आपत्ती व व्यापक स्थानिक आपत्ती अंतर्गत सुमारे १ लाख ६३ हजार शेतकऱ्यांना एकूण १५३ कोटी ४० लाख रुपयांची विमा भरपाई त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असल्याचे माहे मे, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील सुमारे ७३ हजार ७१८ शेतकऱ्यांच्या काढणी नंतर झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीच्या तसेच उत्पन्नावर आधारित नुकसानीवरील ८१ कोटी ९० लाख रुपयांची विमा भरपाई अद्याप प्राप्त झाली नसून त्यासंदर्भात विमा कंपनी शासनास जबाबदार धरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बाधित शेतकऱ्यांना पीक विमा कंपनीकडून पीक विम्याची थकीत रक्कम त्याच्या खात्यावर लवकरात लवकर जमा करण्याबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) होय.
(२) सोलापूर जिल्ह्यात खरीप २०२४ या हंगामात विविध जोखीम बाबींकरीता दिनांक २०/०६/२०२५ अखेर २,३२,८५१ अर्जदार शेतकऱ्यांना रुपये २७८.७१ कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली आहे. त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्ती व व्यापक स्थानिक आपत्ती या बाबींकरीता १,५९,६९९ अर्जदार शेतकऱ्यांना एकूण रुपये १९७ कोटी ६३ लाख इतकी नुकसान भरपाई वितरीत करण्यात आली आहे.
(३) व (४) काढणी पश्चात नुकसान, तसेच पीक कापणी प्रयोगानुसार उत्पादनातील घट याकरीता सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांकडून प्राप्त एकूण ६९,९५४ विमा अर्जांसाठी रुपये ८१.८० कोटी इतकी विमा नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. ही नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांना वितरीत करण्याच्या दृष्टीने विमा कंपनीस राज्य विमा हप्ता अनुदान उपलब्ध करून देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बार्टी व महाज्योती मधील संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळण्याबाबत

**(५) * २५३९ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत सन २०२१ मध्ये नोंदणीकृत ८६१ अनुसूचित जातीतील व महाज्योतीमध्ये पीएचडी नोंदणी केलेल्या भटक्या - विमुक्त, ओबीसी, एसबीसी मधील पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांना मागील दोन वर्षांपासून कोणतीही फेलोशिप मिळाली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फेलोशिप न मिळाल्याने विद्यार्थी मोठ्या आर्थिक अडचणीत आल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला असून विद्यार्थ्यांद्वारे फेलोशिपकरीता आंदोलने केली जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळण्यास विलंब होण्यामागील कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन प्रलंबित फेलोशिपसाठी निधीची तरतूद करून विद्यार्थ्यांना तातडीने लाभ देण्यासाठी कोणती ठोस उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, सदर विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

बार्टी, पुणे या संस्थेमार्फत डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF-२०२१) अंतर्गत नियामक मंडळाच्या ३३ व्या बैठकीतील निर्णयानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या अवॉर्ड दिनांकापासून एकूण ८६१ विद्यार्थ्यांपैकी कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या ७९५ विद्यार्थ्यांना एकूण रुपये ५८,७५,६३,३१९/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली होती. सद्य:स्थितीत बार्टी कार्यालयास ५१२ विद्यार्थ्यांनी प्रगती अहवाल सादर केले आहेत. त्यापैकी एकूण ४१५ विद्यार्थ्यांना एप्रिल, २०२५ पर्यंत एकूण २५,०८,३५,३१६/- इतकी अशी आतापर्यंत एकूण रुपये ८३,८३,९८,६३५/- रक्कम DBT द्वारे अदा करण्यात आलेली आहे.

तसेच, महाज्योती, नागपूर या संस्थेमार्फत महात्मा ज्योतिबा फुले संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये एकूण पात्र ६४८ विद्यार्थ्यांना रुपये ६५,०७,२६,८६९/- इतकी, सन २०२२-२३ मध्ये एकूण पात्र १२३६ विद्यार्थ्यांना रुपये ११६,९८,०३,६६३/- इतकी व सन २०२३-२४ मध्ये एकूण पात्र ९०१ विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रगती अहवालानुसार रुपये १६,००,५०,७३४/- रक्कम अदा करण्यात आलेली आहे. अशी एकूण रुपये १९८,०५,८१,२६६/- इतकी रक्कम सदर योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना अदा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या पिकांच्या अनुदानात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * ३१२७ श्री.राजेश राठोड, श्री.अंबादास दानवे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती चित्रा वाघ, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ या कालावधीत तहसिलदार यांचे लॉगीन व पासवर्ड चा गैरवापर करून अतिवृष्टी, गारपीट व अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीची भरपाईकरीता वितरित करण्यात आलेल्या अनुदानात सुमारे ५० ते ५६ कोटी रुपयांचा आर्थिक गैरप्रकार झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबड व घनसावंगी तालुक्यांतील शेती नसलेल्या सुमारे १८ हजार व्यक्तींच्या बँक खात्यात सुमारे ४२ कोटी रुपये, ५ हजार ५०० लाभार्थ्यांना दोन वेळा लाभ देऊन ८.७० कोटी रुपये, ३ हजार ५०० लाभार्थ्यांच्या खात्यात क्षेत्रवाढ दाखवून ६ कोटी रुपये, ३९ जणांच्या नावावर शासकीय जमीन दाखवून ११ लाख रुपये अनुदान वितरित करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी पंचनामे करताना संबंधित कृषी सहायक, तलाठी व ग्रामसेवक यांनी अप्रामाणिकपणा व कर्तव्यात कसूर केल्यामुळे सदरहू आर्थिक गैरप्रकार झाला असल्याने उक्त प्रकरणाची उच्चस्तरीय समितीमार्फत चौकशी करुन सदर गैरव्यवहारामध्ये दोषी असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१), (२) व (३) जालना जिल्ह्यात सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत तहसिलदार यांचे लॉगिन व पासवर्ड चा गैरवापर करुन अतिवृष्टी, गारपीट व अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसान भरपाई करीता वितरीत करण्यात आलेल्या अनुदानात आर्थिक गैरप्रकार झाल्याचे निदर्शनास आले असून १४५४९ खातेदारांना रुपये ३४.९७ कोटी इतके रुपये अतिरिक्त प्रदान झालेले आहे.

जिल्हास्तरीय चौकशी समितीने दोषी ठरविलेल्या अंबड व घनसावंगी तालुक्यातील २१ ग्राम महसूल अधिकारी/महसूल सहायक/सहायक महसूल अधिकारी यांना निलंबित करण्यात आले आहे.

तत्कालिन तहसिलदार अंबड व घनसावंगी यांचेविरुध्द विभागीय चौकशीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. अन्य तहसिलदार व नायब तहसिलदार यांचेप्रकरणी खुलाश्याचे अवलोकन करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच ३६ ग्राम महसूल अधिकारी/ सहायक महसूल अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांचेमार्फत ग्रामपंचायत अधिकारी व जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी जालना यांचेमार्फत कृषी सहायक यांना नोटीस निर्गमित करण्यात आली असून त्यांचे खुलाश्याची पडताळणी/छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येळवण आणि पिंपळखुटा (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) येथून गौण खनिजांची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत

**(७) * २७६४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येळवण आणि पिंपळखुटा (ता.बार्शीटाकळी, जि.अकोला) शिवारातून रात्रीच्या वेळी रस्ते कंत्राटदाराकडून गौण खनिजांचे उत्खनन करून उक्त खनिजाची सुमारे ५० ते ७० टिप्परमधून वाहतूक करण्यात येत असल्याने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला जात असल्याचे तसेच सदर प्रकरणी महसूल विभागातील संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचे माहे एप्रिल, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध गौण खनिजांचे उत्खनन करणारे कंत्राटदार तसेच संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) तक्रारदार यांनी मौजे विझोरा येथे दिनांक ०५/०६/२०२५ रोजी टिप्पर ने विना रॉयल्टीने मुरूम या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याची तक्रार तहसिलदार, बार्शिटाकळी यांच्याकडे प्राप्त झाली. त्यानुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत विकासक हे सदर सात टिप्पर मधून विनापरवाना अवैध रित्या मुरूम या गौण खनिजाची वाहतूक करत असल्याचे दिसून आले. सदर वाहतूक ही विनापरवानगी व अवैध असल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम

४८ अन्वये संबंधितावर दंडात्मक कार्यवाही करण्याबाबतचा प्रस्ताव तहसिलदार, बार्शिटाकळी यांनी उपविभागीय अधिकारी, मुर्तिजापूर यांना दिनांक १३/०६/२०२५ सादर केला आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्य प्राणी व पक्ष्यांचे पाण्याअभावी मृत्यू झाल्याबाबत

**(८) * ३४२२ श्री.संजय खोडके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील नैसर्गिक जलस्रोत तसेच कृत्रिम पाणवठे माहे एप्रिल, २०२५ मध्ये कोरडे पडल्यामुळे पाण्याअभावी अनेक वन्य प्राणी व पक्ष्यांचे मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पात सौरऊर्जेचा वापर करून उभारण्यात आलेल्या सिमेंट बशी आणि कृत्रिम पाणवठ्यांद्वारे वन्यप्राणी व पक्ष्यांना आवश्यक तेवढा पाणीपुरवठा होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वन्यप्राणी व पक्ष्यांना वर्षभर पुरेशा प्रमाणात पाणी मिळावे यासाठी नैसर्गिक जलस्रोतांचे संवर्धन व कार्यक्षम कृत्रिम पाणवठ्यांची निर्मिती होण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील नैसर्गिक जलस्त्रोत तसेच कृत्रिम पाणवठे माहे एप्रिल, २०२५ मध्ये कोरडे पडल्यामुळे पाण्याअभावी वन्य प्राणी व पक्ष्यांचे मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) वन्यप्राण्यांसाठी व पक्ष्यांना मुबलक पाणीसाठा उपलब्ध होण्याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आल्या आहेत.
नैसर्गिक पाणवठे- ५६१, कृत्रिम पाणवठे-४३२ सोलर पंप-२०२, सिमेंट बंधारे-२६९, मेळघाट बंधारे-१२३६, ॲनिकट बंधारे-१५, माती बंधारे-६७ इत्यादी कामे करण्यात आली आहेत व ज्या ठिकाणी पाणीपातळी कमी झाली आहे अशा ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जातो.

-----------------

## लातूर जिल्ह्यात जंगली प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान होत असल्याबाबत

**(९) * २८४० श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये हरीण, रानडुक्कर व वानर यांसारख्या जंगली प्राण्यांमुळे शेती पिकांचे वारंवार नुकसान होत असल्याने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी तसेच जंगली प्राण्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी संबंधित ग्रामस्थांकडून प्रशासनाकडे केली असल्याचे माहे एप्रिल,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागांमध्ये जंगली प्राण्यांमुळे शेती पिकांचे होणारे नुकसान थांबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) हे खरे आहे.

लातूर जिल्ह्यातील धाराशीव वन विभागांतर्गत अनेक भागामध्ये हरिण, रानडुक्कर, वानर वन्यप्राण्यांमुळे शेती पिकाचे नुकसान केल्याच्या घटना घडतात. लातूर जिल्ह्यातील धाराशीव वन विभागांतर्गत मागील ३ वर्षातील (सन २०२२-२०२५) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात शेतपीकाचे नुकसानीबाबत एकूण प्रकरणांची संख्या ७४७ असून सदर प्रकरणांमध्ये नुकसान भरपाईची रक्कम १८.३० लक्ष अदा करण्यात आली आहे.
(२) व (३) वन्य प्राण्यांमुळे शेत पीक नुकसानीच्या घटनेत शासन परिपत्रक दिनांक २८/११/२०१६, महाराष्ट्र शासन अधिसूचना दिनांक ३०/०१/२०२४ व अनुषंगीक शासन निर्णयात ठरवून दिलेल्या मापदंडानुसार विहित कालमर्यादेत संबंधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वन विभागाकडून नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

धाराशीव वन विभागाचे कार्यक्षेत्रात मानव-वन्यजीव संघर्ष टाळणेकामी आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजनांबाबत क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांचेकडून तसेच संयुक्त वन व्यवस्थापन समितीमार्फत ग्रामीण भागात वेळोवेळी लोकांसमवेत चर्चा करुन लोकांमध्ये जनजागृती करण्यात येते. मानव-वन्यजीव संघर्ष टाळणेकामी ग्रामीण भागातील लोकांना करावयाच्या उपाययोजनांबाबत, अवलंबवावयाच्या कार्यपध्दतीबाबत ग्रामसभेत, वन्यजीव सप्ताह, जागतिक वन दिन, जागतिक पर्यावरण दिन, वसुधरा दिन, जैवविविधता दिन इ. प्रसंगी सखोल मार्गदर्शन करण्यात येते.

-----------------

## राज्यातील मच्छीमार बोटींना करमुक्त डिझेल कोटा मिळण्याबाबत

**(१०) * २४६७ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खोल समुद्रातील मासेमारी करणाऱ्या १३९ मच्छीमार सहकारी संस्थांनी मच्छीमार नौकांची तपासणी मुदतीत न केल्याने तसेच परिपूर्ण तपासणी अहवाल मुदतीत सादर न केल्यामुळे, सहकारी संस्थेच्या सदस्यांच्या मच्छीमार नौकांना करमुक्त डिझेल कोटा मिळणार नसल्याने पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या सागरी जिल्ह्यांतील सुमारे ३५०० मच्छीमार नौका कोट्यापासून वंचित राहणार असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मच्छीमार सहकारी संस्थांकडे असलेल्या शेकडो सदस्य नौकांची तपासणी वेळेत पूर्ण करणे व्यवहार्य नसल्यामुळे आणि तपासणीदरम्यान अनेक नौका १०–१५ दिवस मासेमारीसाठी समुद्रात जात असल्यामुळे तपासणी प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याने सर्व नोंदणीकृत मच्छीमार नौकांना करमुक्त डिझेल कोटा मंजूर करावा अशी विनंती करंजा मच्छीमार सहकारी संस्थेसह इतर संस्थांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मच्छीमारांचे नुकसान टाळण्याच्या दृष्टीकोनातून सर्व नोंदणीकृत मच्छीमार नौकांना करमुक्त डिझेल कोटा मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) व (२) हे खरे नाही.

माहे मार्च, २०२५ मध्ये सन २०२५-२६ करीता राज्यातील सर्व सागरी जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांनुसार १३८ मच्छीमार सहकारी संस्थांच्या परवाना/विमा विधिग्राह्य असलेल्या तसेच प्रत्यक्ष तपासणी केलेल्या ७७९६ मासेमार यांत्रिक नौकांचा दिनांक ०१ एप्रिल, २०२५ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधी करीता त्यांना आवश्यक असणाऱ्या वार्षिक डिझेल कोटा (जून व जुलै हे मासेमारी बंदी कालावधी वगळून), अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(३) माहे मार्च, २०२५ मध्ये सन २०२५-२६ करीता राज्यातील सर्व सागरी जिल्ह्यातील प्राप्त प्रस्तावांनुसार १३८ मच्छीमार सहकारी संस्थांच्या परवाना/विमा विधिग्राह्य असलेल्या तसेच प्रत्यक्ष तपासणी केलेल्या ७७९६ मासेमारी यांत्रिक नौकांचा डिझेल कोटा मंजूर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे निविष्ठा कंपन्या चालविल्या जात असल्याबाबत

**(११) * ३४३७ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील काही खते, बियाणे, किटकनाशके तसेच जैव उत्तेजके निर्माण करणाऱ्या कंपन्यांशी कृषी खात्यातील अधिकाऱ्यांचे लागेबांधे असल्याचे आरोप केले जात असून, त्यानुसार राज्यातील कृषी विभागातील काही अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे निविष्ठा कंपन्या चालविल्या जात असल्याबद्दल झालेल्या आरोपांची चौकशी शासनाने सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लोकप्रतिनिधींनी अधिकाऱ्यांच्या नावासह शासनाकडे निवेदन सादर केले असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनीही या निवेदनाबाबतची दखल घेत चौकशीचे लेखी आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील कृषी विभागातील काही अधिकाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे निविष्ठा कंपन्या चालविणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड.माणिकराव कोकाटे :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी दिनांक ११/०३/२०२५, दिनांक १५/०४/२०२५, दिनांक ०२/०५/२०२५ व दिनांक १६/०५/२०२५ च्या तक्रार अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात कृषी आयुक्तालयाकडून दिनांक ०९/०६/२०२५ रोजी प्राथमिक चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे.

सदर प्राथमिक चौकशी अहवाल, आयुक्त (कृषी) यांनी केलेल्या शिफारशी आणि दरम्यान प्राप्त झालेल्या दिनांक २७/०५/२०२५ व दिनांक २८/०५/२०२५ च्या तक्रार अर्जांत उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून चौकशी करण्याकरीता प्रस्ताव गृह विभागास दिनांक २४/०६/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यातील नाणार व राजापूर भागात परप्रांतीयांनी बनावट शेतकरी दाखल्यांच्या आधारे शेतजमिनी खरेदी केल्याबाबत

**(१२)** * **२३१९ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषतः कोकण विभागात मध्यप्रदेश व राजस्थानमधील नागरिकांकडून बनावट शेतकरी दाखले वापरुन शेतजमिनी खरेदी केल्या जात असल्याची बाब दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी रत्नागिरी जिल्ह्यातील नाणार व राजापूर भागात परप्रांतीयांनी सुमारे २०० एकर शेतजमीन खरेदी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात विशेषत: कोकणात मध्यप्रदेश व राजस्थानमधील नागरिकांकडून बनावट शेतकरी दाखल्याच्या आधारे खरेदी करण्यात आलेल्या जमिनींची नोंदणी रद्द करण्याकरीता कोणती कार्यवाही केली तसेच संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) ही बाब खरी नाही.
कोकण विभागामध्ये मध्यप्रदेश व राजस्थानमधील नागरिकांकडून बनावट शेतकरी दाखल्याच्या आधारे शेतजमिनी खरेदी केल्याची बाब दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साईनगर, कोंढवा बु., मौजे कात्रज, (ता.हवेली, जि.पुणे) येथील राखीव वनक्षेत्रातील जमीन खाजगी शिक्षण संस्थेस मंजूर केल्याबाबत

**(१३)** * **२६४७ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साईनगर कोंढवा बु.,मौजे कात्रज (ता.हवेली, जि.पुणे) येथील वन विभागाच्या राखीव वनक्षेत्रातील काही जमिनीचा भाग खाजगी शिक्षण संस्थेस मंजूर करण्यात आल्याची तसेच सदर मंजुरी वनविभागाच्या नियमबाह्य व बेकायदेशीर स्वरूपाची असून याबाबत चौकशी करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वनविभागाकडे केली असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंजुरी देताना सदर खाजगी संस्थेच्या जागेपर्यंत पोहोचण्यासाठी वनविभागाच्या जमिनीशिवाय इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याचा दाखला संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून घेण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेच्या जागेपर्यंत जाण्यासाठी इतर पर्यायी मार्ग उपलब्ध असतानाही तसेच संस्थेची इमारत अनधिकृत असतानाही वनविभागाने वस्तुस्थितीची पडताळणी न करता संस्थेच्या जागा मागणीच्या प्रस्तावास मंजुरी दिली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावास बेकायदेशीर मंजुरी देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) अशा प्रकारची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी उपवनसंरक्षक, पुणे यांच्या कार्यालयाकडे दिनांक ०५/०५/२०२५ रोजी केली, हे खरे आहे.

तथापि, वन (संवर्धन) अधिनियम १९८०, अंतर्गत वनेत्तर कामासाठी वनजमीन वळतीकरणाच्या प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. उक्त अधिनियमामधील तरतुदीनुसार वनविभागाच्या जमिनीशिवाय इतर कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याबाबत क्षेत्रिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात येते.

सदर क्रिऐटीव्ह इंग्लिश स्कूलकरीता पोहोच रस्त्याच्या प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने पुनर्पडताळणी केली असता, शिक्षण विभागाकडून सदर शाळा स्थापन करण्यासाठी परवानगी प्राप्त असून, पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडून शैक्षणिक इमारत बांधकामास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिले असल्याचे दिसून आले आहे.

तसेच, सदर शाळेला जाण्यासाठी दुसरा पर्यायी आणि कमी अंतरावरील रस्ता उपलब्ध नसल्याचे क्षेत्रिय वन अधिकाऱ्यानी प्रमाणित केले असून, कमीत कमी वनजमीन वळती होण्याच्या दृष्टीने मागणी प्रस्ताव ९ मी. ऐवजी ४.५ मी. रुंदीच्या रस्त्याचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला. केंद्र शासनाने त्यास प्रथम तत्वत: मान्यता प्रदान करुन, तद्नंतर अंतिम मंजुरी दिलेली आहे. वनजमीन वळतीकरणाचे आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्हा परिषदेंतर्गत रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१४)** * **२७५७ श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदुरबार जिल्हा परिषदेतंर्गत ११०३ रस्त्यांची कामे न करता सदर कामांची देयके अदा करण्यात आली असून याबाबत नंदुरबार जिल्हा परिषदेच्या लोकप्रतिनिधींकडून माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यासुमारास तक्रार दाखल करण्यात आली असल्याचे तसेच उक्त ठेकेदाराबाबत अनेक तक्रारी असून याप्रकरणी संबंधित स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करुन रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहारात सहभागी असणारे ठेकेदार तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नंदुरबार व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, नंदुरबार यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) लेखाशीर्ष ३०५४ २७२२ अंतर्गत नंदुरबार जिल्ह्यातील मंजूर रस्ते व पुलांच्या दुरुस्तीच्या कामाच्या अनुषंगाने माहे मे, २०२३ मध्ये व त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींकडून तक्रार प्राप्त झाल्या होत्या. सदर विषयाच्या बाबतीत मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.३६/२०२३ दाखल करण्यात आलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## करंजी घाटाजवळील (ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर) गर्भगिरी डोंगराला लागलेल्या आगीबाबत

**(१५) * २९६६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करंजी घाटाजवळील (ता.पाथर्डी, जि.अहिल्यानगर) गर्भगिरी डोंगराला लागलेल्या आगीत शेकडो एकर क्षेत्रातील झाडांचा कोळसा होऊन जंगलातील अनेक पशुपक्षी जखमी झाल्याचे तर काही मृत्यूमुखी पडल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे, खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचा अहवाल वन विभागाने शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आगीत जखमी झालेल्या पशुपक्षी यांच्या उपचारासाठी तसेच जंगलाच्या संवर्धनासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) माहे एप्रिल, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात करंजी नियतक्षेत्राजवळील गर्भगिरी डोंगरास दिनांक ०१/०४/२०२५ व ०७/०४/२०१५ रोजी आगी लागण्याच्या घटना घडलेल्या आहेत. दिनांक ०१/०४/२०२५ व दिनांक ०७/०४/२०२५ च्या आगीत ७.०० हे. वनक्षेत्र जळाले आहे. सदर आगीत गवत व पालापाचोळा जळाला आहे. सदर घटनेत लगतच्या वनेत्तर क्षेत्रांमध्ये आग लागल्याचे आढळले. सदर आगीमध्ये कोणतेही पशुपक्षी जखमी किंवा मृत झालेले नाहीत. आगीवर वन कर्मचारी व ग्रामस्थांच्या मदतीने तसेच ब्लोअर मशीनच्या साहाय्याने वेळीच नियंत्रण मिळविलेले आहे. याबाबत नियमानुसार वन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.
(३) व (४) सदर आगीत कोणताही पशुपक्षी मृत्यूमुखी व जखमी झालेला नाही. तसेच जंगलाच्या संवर्धनासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१. रोपवन क्षेत्रात जाळरेषा घेण्यात येते व फायर वॉचरची नेमणुक करण्यात येते.
२. संयुक्त वनव्यवस्थापन समिती मार्फत व ग्रामस्थांच्या मदतीने गावामध्ये वनवणवा प्रतिबंधक उपाययोजनेबाबत जनजागृती केली जाते.

३. आग लागल्याबाबतचे संदेश भारतीय वन सर्वेक्षणच्या हेल्पलाईनवरून मिळते व त्यावर वेळीच कार्यवाही केली जाते.

४. विभागामार्फत कार्यशाळेचे आयोजन करुन वनपाल व वनरक्षक यांना वनवणव्याच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना व मार्गदर्शन देण्यात येते.

-----------------

## राज्यात शाश्वत सिंचन योजनेची लॉटरी गत एक वर्षापासून काढण्यात आली नसल्याबाबत

**(१६) * ३२८९ श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.वसंत खंडेलवाल :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या "शाश्वत सिंचन योजना" अंतर्गत यांत्रिकीकरणासाठी अर्ज केलेल्या शेतकऱ्यांची निवड लॉटरी पध्दतीने करण्यात येत असून मागील एक वर्षापासून लॉटरी काढण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेंतर्गत आवश्यक निधी उपलब्ध नसल्यामुळे लॉटरी प्रक्रियेमध्ये विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रलंबित लॉटरी प्रक्रिया तातडीने राबवून अर्जदार शेतकऱ्यांची निवड करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) हे खरे नाही.

मुख्यमंत्री शाश्वत सिंचन योजना व कृषी यांत्रिकीकरण योजना या दोन वेगवेगळया योजना आहेत. सन २०२४-२५ मध्ये कृषी यांत्रिकीकरण योजनेतर्गत लॉटरी काढण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सन २०२४-२५ मध्ये कृषी यांत्रिकीकरण योजनेसाठी रुपये २३०.६८ कोटी निधी वितरीत करण्यात आला होता.तसेच सन २०२५-२६ करीता कृषी यांत्रिकीकरण योजनेकरीता रुपये ६०९.२६ कोटी नियतव्यय मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरात कांदळवनांची तोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * २७५१ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगर परिसरात असलेल्या कांदळवनांचे संरक्षण करण्यासाठी शासनाकडून अनेक उपाययोजना करण्यात येत असतानाही मुंबईतील विविध भागांमध्ये कांदळवनांची सर्रासपणे तोड होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाडी व नदीकिनारी अनधिकृत झोपडपट्ट्या व बांधकामे करण्यासाठी झोपडपट्टी दादा, पोलीस व महानगरपालिकेच्या काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने कांदळवनांची तोड केली जात आहे, हे ही खरे आहे काय?
(३) असल्यास, कांदळवनांची तोड रोखण्यासाठी व तोड करणाऱ्यांस मदत करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत तसेच कांदळवनाचे पुनर्रोपण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील एकूण ४३१३.३१ हे. क्षेत्र कांदळवन विभाग उत्तर कोकण यांच्या ताब्यात असून कांदळवन क्षेत्राची सर्रासपणे तोड होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आलेली नाही.

तथापि, लोकहिताचे सार्वजनिक प्रकल्पांच्या अनुषंगाने विविध यंत्रणेकडून वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासन व मा.उच्च न्यायालयाच्या पूर्वपरवानगीने प्रकल्पात बाधित होणाऱ्या कांदळवन वृक्षांची तोड करण्यात येत असते. सदर कांदळवन वृक्षाच्या तोडीच्या बदल्यात कांदळवन रोपवन तयार करण्यात येत असते.

वन विभागाच्या ताब्यातील कांदळवनांवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी क्षेत्रिय अधिकारी/ कर्मचारी व महाराष्ट्र सुरक्षा रक्षक यांच्यामार्फत वेळोवेळी दैनंदिन गस्त घालण्यात येते. तसेच कांदळवन क्षेत्राच्या हद्दीवर पिलर्स/संरक्षण भिंत बांधण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## १७ केंद्रीय आदिवासी आश्रम शाळांचे वर्गीकरण करण्याबाबत

**(१८) * २९३१ श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यात सन २००३-०४ पासून १७ केंद्रीय आदिवासी आश्रमशाळा सुरु असून सदर शाळेमध्ये आदिवासी समाजातील ४००० च्या वर विद्यार्थी शिक्षण घेत असून केंद्र शासनाकडून मिळणारे अनुदान हे सहायक स्वरुपात भेटत असल्यामुळे तेथील शिक्षकांना रुपये १३५०० व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना रुपये ७५०० असे नाममात्र मानधन मिळते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील १७ केंद्रीय आदिवासी आश्रमशाळांचे वर्गीकरण होण्याकरीता आंदोलने/उपोषण करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, १७ केंद्रीय आदिवासी आश्रमशाळांचे राज्यात वर्गीकरण होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) अंशत: खरे आहे.

सन २००३-०४ पासून सुरू करण्यात आलेल्या १७ केंद्रिय आदिवासी आश्रमशाळापैकी सद्य:स्थितीत १५ केंद्रिय आदिवासी आश्रमशाळा सुरू असून सदर शाळेमध्ये आदिवासी समाजातील ३०३९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

तेथील शिक्षकांना तसेच चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या "अनुसूचित जमातीच्या कल्याणाकरीता काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना सहाय्यक अनुदाने" (GRANT-IN-AID TO VOLUNTARY ORGANISATIONS WORKING FOR THE WELFARE OF THE SCHEDULED TRIBES (STs)) या योजनेमध्ये निर्धारित केल्यानुसार मानधन दिले जाते.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवनाळा (ता.पवनी, जि.भंडारा) येथील रेती घाटमालक शासनाचा महसूल बुडवित असल्याबाबत

**(१९)** * **२८६२ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवनाळा (ता.पवनी, जि.भंडारा) येथील रेती घाटातून घाटमालक दररोज सुमारे ३०० टिप्पर मधून ११ ब्रास रेतीची वाहतूक करित असून प्रत्यक्षात केवळ २ ब्रास रेतीची रॉयल्टी नोंदवून शासनाच्या महसूलामध्ये अनियमितता करित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित घाटमालक शासनास केवळ २ ब्रास रेतीची रॉयल्टीवर प्रतिब्रास रुपये १६२० भरून उर्वरित ९ ब्रास रेती प्रतिब्रास रुपये २५०० प्रमाणे बाहेरील विकासकांना विकून दररोज सुमारे रुपये १ कोटी १८ लाख ७९ हजार ७०० इतका शासनाचा महसूल बुडवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रेतीची वाहतूक भिवापूर मार्गे नागपूर शहर व जिल्ह्यामध्ये करण्यात येत असून, भिवापूर पोलीस स्थानक व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी घाटमालकाचे आर्थिक संगनमत असल्यामुळे अवैधरित्या होणाऱ्या रेती वाहतुकीवर कोणतीही कारवाई करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिवनाळा येथील घाटामधून होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीची वाहतूक रोखण्याकरीता तसेच घाटमालकाशी संगनमत करुन शासनाचा महसूल बुडविणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) डेपो क्रमांक ०४ मौजा शिवनाळा, ता.पवणी, जि.भंडारा येथील डेपोधारक यांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये एकूण १,३८१ वाहनाव्दारे ४,८८३.८५ ब्रास वाळूची विक्री केली आहे व त्यापासून माहे एप्रिल, २०२५ मध्ये शासनास रुपये ६७,४४,५९६/- इतका महसूल प्राप्त झाला असून, सदर डेपो मधून सरासरी ४६ वाहनांची वाहतूक झालेली आहे.

(३) नागपूर जिल्ह्यातील उमरेड उपविभागात अवैध रेतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तयार करण्यात आलेल्या चेक पोस्ट वर महसूल व पोलीस पथक तैनात करण्यात आले असून, दिनांक ०१/०४/२०२५ ते १३/०६/२०२५ या कालावधीत भिवापूर तालुक्यातील अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर एकूण रुपये ५१,३०,१००/- एवढ्या दंडात्मक रकमेची वसूली करण्यात आलेली आहे.

पोलीस स्टेशन, भिवापूर यांच्याकडून भिवापूर मार्गे होत असलेल्या अवैध रेती वाहतुकीबाबत माहे जानेवारी, २०२४ त मे, २०२५ या कालावधी दरम्यान एकूण १३०३ गुन्हे दाखल केले असून, ८१४ ब्रास रेती किंमत रू ३४,९०,०००/- जप्त करून यामध्ये १०७ टिप्पर, ०५ ट्रॅक्टर, ०३ एल.पी. एकूण किंमत रुपये २७,३७,१०,०००/- एवढ्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यामध्ये २१७ आरोपींना अटक करून १४९ आरोपितांविरूध्द प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, एकूण ०५ आरोपी विरूध्द हद्दपारीचे प्रस्ताव तयार करण्यात येत असून, ०२ आरोपी विरूध्द एमपीडीए कायद्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात आले आहे.

(४) माहे एप्रिल, २०२५ ते मे, २०२५ या कालावधीत तहसिलदार, पवनी यांनी अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्या १३ वाहनांवर कारवाई करून रुपये ०७,४२,२००/- इतक्या रकमेची दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, त्यापैकी रुपये ०६,१८,६००/- एवढ्या दंडात्मक कारवाईची रक्कम वसूल करण्यात आली आहे. अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी महसूल व पोलीस विभागाची संयुक्त पथके स्थापन करण्यात आली आहेत. सद्य:स्थतीत डेपोधारक यांची डेपो निविदा रद्द करण्यात येवून अनामत रक्कम जप्त केली आहे व डेपोमधील शिल्लक रेती साठा जप्त करण्यात आला आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

-----------------

## टेंभू उपसा सिंचन प्रकल्पामुळे सातारा जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळण्याबाबत

**(२०) * ४२२२ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील सुपने व पश्चिम सुपने गावातील टेंभू उपसा सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टेंभू प्रकल्पासाठी कोयना नदीकाठावरील वरील दोन्ही गावातील एकूण २०३ गटांतील बाधित जमिनीच्या भूसंपादनाची अधिसूचना माहे ऑगस्ट, २०२० मध्ये प्रसिध्द होऊनही अद्याप मोबदला न मिळाल्याने तसेच जमिनीच्या मोबदल्याची प्रक्रियाही सुरू न झाल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टेंभू उपसा सिंचन प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२) व (३) दिनांक २५ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार, भूसंपादन संस्था म्हणून कार्यकारी अभियंता, टेंभु उपसा सिंचन प्रकल्प विभाग ओगलेवाडी, ता.कराड यांनी खाजगी जमीन थेट खरेदी पध्दतीने घेण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सातारा यांना अनुक्रमे दिनांक ०७/०६/२०२२ व दिनांक १०/१०/२०२३ रोजी सादर केलेले आहेत.

सदर प्रस्ताव व जाहिरातीस मिळालेला प्रतिसाद विचारात घेऊन एकूण २.४४ हे. आर क्षेत्र मूल्यांकनास दिनांक १३/०२/२०१९ रोजी मान्यता देण्यात आली असून त्यानुसार कार्यकारी अभियंता यांच्यामार्फत दस्त खरेदीची प्रक्रिया सुरू आहे.

थेट खरेदी प्रस्तावामधील उर्वरित १.८२ हे. आर जमिनीची मूल्यांकनाबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून कार्यकारी अभियंता टेंभू उपसा सिंचन प्रकल्प विभाग ओगलेवाडी यांचे मार्फत दस्त खरेदी बाबतची कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बार्शीटाकळी (जि.अकोला) येथे सिंचन विहीर योजनेमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२१) * २७७९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बार्शीटाकळी (जि.अकोला) येथील गटविकास अधिकारी यांच्या संगनमताने शासकीय कार्यालयातील लिपिक यांच्या मुलाला आर्थिक व्यवहारातून सिंचन विहीर मंजूर करण्यात आली असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगा अंतर्गत मिळालेल्या विहिरी या जेसीबी यंत्राद्वारे खोदण्यात आल्या असून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी गैरव्यवहार करुन शासनाची फसवणूक केली असल्याची तक्रार गोपाळ विश्वंभर ढोरे, (रा.सोनेगिरी,ता.बार्शीटाकळी) यांनी दिनांक ४ मार्च, २०२५, दिनांक ६ मार्च,२०२५ व दिनांक २० मार्च, २०२५ रोजी मा.जिल्हाधिकारी, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त बार्शीटाकळी (जि.अकोला) येथील शासकीय कार्यालयातील आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) ग्रामपंचायत सोनेगिरी येथील मान्यताप्राप्त १४ सामुहिक सिंचन विहिरींपैकी प्रत्यक्ष सुरू असलेल्या ९ लाभार्थ्यांच्या विहिरीचा स्थळ पंचनामा ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, तांत्रिक अधिकारी, ग्रामरोजगार सेवक व संबंधित लाभार्थी यांच्या समक्ष केला असून चौकशी वेळी जेसीबीचा वापर केलेला आढळून आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) उपविभागातील नदीपात्रांमध्ये अवैधरित्या वाळू उत्खनन होत असल्याबाबत

**(२२)** * **३६७३ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा जिल्ह्यात विशेषतः तुमसर उपविभागात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या वाळू उत्खनन होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.महसूल मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी ते मार्च, २०२५ या कालावधीत लेखी निवेदन सादर केल्याचे तसेच बावनथडी व वैनगंगा नदीपात्रामध्येही नियमबाह्य वाळू उत्खनन व चोरी होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील विशेषतः तुमसर उपविभागातील अवैध वाळू उत्खनन रोखण्यासाठी तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय हे खरे आहे.

(२) तुमसर तालुक्यातील बावनथडी व वैनगंगा नदी जवळील मौजे उमरवाडा, तामसवाडी, वारपिंडकेपार, लोभी व सोंड्या येथील अवैध उत्खनन करून रेती साठा केलेली १८,३०९ ब्रास रेती जप्त करून नजीकच्या डेपोमध्ये जमा करून घरकुल लाभार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे तुमसर तालुक्यामध्ये माहे मे, २०२५ मध्ये अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी महसूल व पोलीस विभागाकडून ०८ ट्रक, ०९ ट्रॅक्टर व ०३ ट्रॅक्टरलोडर अशी एकूण २० वाहनांवर जप्तीची कारवाई करून १४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जप्त केलेल्या २० वाहनांपैकी ०६ वाहनांकरीता माहे मे, २०२५ मध्ये एकूण रुपये १७,२१,०००/- एवढा दंड वसूल केला आहे.

तुमसर उपविभागातील अवैध रेती उत्खनन व वाहतूक प्रकरणी उपविभागीय अधिकारी तुमसर व तहसिलदार, तुमसर यांना दिनांक ०९/०४/२०२५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे राजुरा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील लीजवर देण्यात आलेल्या जमिनीचा वापर न केल्याबाबत

**(२३)** * **४१३९ डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे राजुरा (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील सर्व्हे क्र. १४९ मधील सुमारे १० एकर गायरान जमीन सन १९७०–७५ दरम्यान "राजुरा रि. फॅक्टरीज ॲण्ड प्रायव्हेट लिमिटेड" या कंपनीला औद्योगिक वापरासाठी लीजवर देण्यात आली होती, परंतु मागील २०–२५ वर्षांपासून सदर जमीन औद्योगिक वापरात नसून संबंधित कंपनीने ती जमीन एका खाजगी व्यक्तीस परस्पर विकल्यामुळे शासनाच्या जमिनीचा गैरवापर झाल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कंपनीकडे दिलेली जमीन सध्या पडीत व गैरवापरात असल्याने शासनाने दिलेल्या अटींचा भंग झालेला असून या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, राजुरा यांनी शासनाकडे जमीन परत घेण्याचा अहवाल जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे सादर केला असूनही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, "राजुरा रि. फॅक्टरीज ॲण्ड प्रायव्हेट लिमिटेड" या कंपनीने उपरोक्त जमिनीबाबत शर्तभंग केल्याप्रकरणी सदर जमीन शासनाकडे परत घेण्याकरीता तसेच याप्रकरणी दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

सदर जमीन शासन जमा करण्याचा परिपूर्ण प्रस्ताव दिनांक १८/०६/२०२५ रोजी उपविभागीय अधिकारी, राजुरा यांनी सादर केलेला असून सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या विचाराधिन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सागरी हद्दींमध्ये बोटी बंदीक्षेत्रामध्ये विनापरवाना मासेमारी करण्यात येत असल्याबाबत

**(२४) * ३६०८ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्याच्या १२ सागरी मैलांपर्यंतच्या जलक्षेत्रात पर्ससीन तसेच एलईडी प्रकाशझोताच्या सहाय्याने मासेमारी करण्यास संपूर्णपणे बंदी असतानाही शासनाच्या अनुदानित डिझेलचा वापर करून पर्ससीन व एलईडी यंत्रणा बसवलेल्या भांडवलदारांच्या बोटी बंदीक्षेत्रात व त्यापलीकडील सागरी हद्दीत विनापरवाना मासेमारी करत असल्याचे कोळी युवाशक्ती संघटनेने मा.मत्स्यव्यवसाय मंत्री यांना माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन आर्थिक वर्षासाठी मच्छीमार बोटींना शासनाच्या अनुदानित डिझेल कोट्याचे वितरण करताना संबंधित बोटीवर पर्ससीन व एलईडी यंत्रणा बसविण्यात आली नसल्याची खातरजमा करुन स्थानिक परवाना अधिकारी व मत्स्यक्षेत्र निरीक्षक यांच्यामार्फत डिझेल कोटा मंजूर करण्याची मागणी कोळी युवाशक्ती संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या डिझेल अनुदानाचा गैरवापर केल्याबाबत तसेच संबंधित बोटींना परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात वा बोटी मालकांविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे :** (१) हे अंशत: खरे आहे. कोळी युवाशक्ती सघटनेने याबाबत निवेदन शासनाकडे सादर केले होते.
(२) डिझेल कोटा मंजूरीसाठीचे प्रस्ताव आयुक्त मत्स्यव्यवसाय कार्यालयास प्रस्तावित करण्यापूर्वी अवैध मासेमारी सामग्री व उपसाधने न वापरता मासेमारी करीत असल्याबाबतची जिल्हास्तरावरुन पडताळणी करुन खातरजमा केली जाते. त्यानुसार सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी प्रमाणित करुन सागरी जिल्हा कार्यालयामार्फत डिझेल कोट्याचा प्रस्ताव सादर करण्यात येतो. तसेच प्रत्यक्षात तपासणी करण्यात आलेल्या, विधीग्राह्य, वैधता असलेले विमा व मासेमारी परवाना धारक मच्छीमार नौका मालक सभासदांच्या डिझेल प्रतिपुर्ती प्रस्तावाची छाननी होऊन, प्रतिपुर्तीची देय व मंजूर झालेली संपूर्ण रक्कम सर्व निकषांची, नियमांची, सुचनांची पुर्तता झाली असल्यास रितसर संबंधित पात्र नौका मालकांच्या बँक खात्यात VPDA प्रणाली अंतर्गत DBT द्वारे जमा करण्यात येते.
(३) शासन अधिसूचना दिनांक २७/०४/२०१८ अन्वये राज्याच्या जलधीक्षेत्रात LED द्वारे मासेमारी करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.केंद्र शासनाचे दिनांक १०/११/२०१७ अन्वये राज्याच्या सागरी जलधी क्षेत्रापलिकडील क्षेत्रामध्ये पेअर ट्रालिंग/बुल ट्रालिंग पध्दतीने मासेमारी करण्यास प्रतिबंध केला आहे. शासन आदेश दिनांक १०/०८/२०२२ अन्वये प्रक्षेत्र-१ झाई ते मुरुड येथे पर्ससीन/रिंगसिन जाळयाद्वारे १२ सागरी मैलापर्यंतच्या जलधी क्षेत्रात बंदी घालण्यात आली आहे. अनधिकृत पर्ससीन व LED द्वारे मासेमारी करणाऱ्या एकूण ११६५ अनधिकृत नौकांवर कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.